आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

४ एप्रिल २०२४ - गुरुवार

कर्करोग रुग्णांसाठी CAR-T सेल उपचार पद्धतीमुळे सर्व मानव जातीसाठी आशेचा नवा किरण निर्माण झाल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे.

त्यांनी आज आपल्या मुंबई भेटीत आय आय टी मुंबईत CAR-T सेल उपचार पद्धतीचं लोकार्पण केलं. त्यानंतर आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. संपूर्ण भारतीय बनावटीच्या या उपचार पद्धतीमुळे अनेकांचे प्राण वाचणार आहेत, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या उपचार पद्धतीमुळे भारताला प्रगत वैद्यकीय सेवा देणाऱ्या देशांच्या यादीत स्थान मिळालं असल्याची भावना राष्ट्रपतींनी व्यक्त केली. रुग्णांसाठी किफायतशीर आणि सहज उपलब्ध असलेल्या  टाटा मेमोरियल सेंटर आणि आयआयटी मुंबईनं संयुक्तरित्या याची निर्मिती केली आहे. या पद्धतीमुळे कमी कमी खर्चात रुग्णांवर परिणामकारक उपचार शक्य होणार आहे. यावेळी राज्यपाल रमेश बैस, आयआयटी मुंबईचे संचालक सुभाशिष चौधरी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपणार आहे. या टप्प्यात १२ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या ८८ लोकसभा मतदारसंघांमधे निवडणूक होणार आहे. राज्यातल्या बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या ८ लोकसभा मतदारसंघात दुसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे. या सर्व मतदारसंघात उमेदवारी अर्ज भरण्यासाठी उमेदवारांची लगबग सुरू आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज **हिंगोलीत** महायुतीच्या उमेदवाराचा अर्ज भरण्यासाठी दाखल झाले आहेत. शिवसेनेचे नांदेड जिल्हा प्रमुख बाबुराव कदम कन्हाळीकर यांनी आज अर्ज भरला. यापूर्वी पक्षानं इथून विद्यमान खासदार हेमंत पाटील यांना उमेदवारी जाहीर केली होती.

**अमरावतीमध्ये** भाजपा उमेदवार नवनीत राणा यांनी अर्ज भरण्यापूर्वी सभा झाली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यावेळी उपस्थित होते.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज अकोल्यातून अर्ज भरला. यावेळी विविध समाजाचे नेते उपस्थित होते.

**नांदेडमध्ये** भाजपा उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर अर्ज दाखल करायला गेले तेव्हा माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण उपस्थित होते. वंजित बहुजन आघाडीचे उमेदवार अविनाश भोसीकर यांनीही नांदेडमधून आज अर्ज भरला.

**<><><><><>**

अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांचं अनुसूचित जातीचं जात प्रमाणपत्र सर्वोच्च न्यायालयानं वैध ठरवलं आहे. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीनं पुरेशा कागदपत्रांची तपासणी करुन त्यांचं जात प्रमाणपत्र वैध ठरवलं आहे. त्यामुळं त्यात कोणाच्याही हस्तक्षेपाची गरज नसल्याचं स्पष्ट मत न्यायमूर्ती जे के माहेश्वरी आणि संजय करोल यांच्या पीठानं नोंदवलं.

माजी खासदार आनंदराव अडसूळ आणि सुनिल भालेराव या नेत्यांनी राणा यांच्या जात प्रमाणपत्रावर आक्षेप घेणाऱ्या याचिका २०१७ मध्ये दाखल केल्या होत्या. राणा यांनी निवडणूक अर्ज दाखल करताना अनुसूचित जमातीबाबत दिलेले प्रमाणपत्र बोगस आहे. जात प्रमाणपत्र समितीसमोरही त्यांनी खोटा जातीचा दाखला दिलेला आहे, असा आरोप या याचिकांच्या माध्यमातून करण्यात आला होता. त्यावर राणा या शिख-चामार जातीतल्या आहेत. महाराष्ट्रातली मोची किंवा चांभार ही जात यापेक्षा वेगळी असल्याचं निरीक्षण नोंदवत मुंबई उच्च न्यायालयानं त्यांचं जात प्रमाणपत्र अवैध ठरवलं होतं. त्याला राणा यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान

दिलं होतं. शिख-चांभार यातला शिख हा शब्द धर्मवाचक असल्याचा दावा राणा यांनी केला होता.

<><><><>

उत्तर - पश्चिम मुंबई मतदार संघातून निवडणूक लढवणार असल्याचं संजय निरुपम यांनी आज जाहीर केलं आहे. कॉंग्रेसनं काल त्यांची पक्षातून हकालपट्टी केली होती. पक्षविरोधी वक्तव्यं आणि शिस्तभंगांच्या तक्रारीनंतर ही कारवाई झाली.

<><><><>

ठाणे जिल्ह्यात अंबरनाथ इथं जांभुळ गावात आज पाण्याची टाकी स्वच्छ करताना विजेचा धक्का लागून तीन मजुरांचा जागीच मृत्यू झाला. पंपिंग यंत्रातून वीज पाण्यात शिरल्यामुळे ही दुर्घटना झाल्याचं पोलिसांनी सांगितलं. या घटनेचा तपास सुरू आहे.

<><><><>

माथाडी कामगारांना व्यापारांकडून दिला जाणाऱ्या मोबदल्याबाबतचं प्रकरण उच्च न्यायालयात सुरू असल्यामुळं हमाली, तोलाई कपात करायची नाही असा निर्णय व्यापारी संघटनांनी घेतला आहे, त्यामुळं नाशिक जिल्ह्यातल्या माथाडी कामगारांनी तोडगा  निघेपर्यंत दैंनदिन वजन मापाच्या कामकाजात सहभागी होणार नसल्याची भूमिका घेतली आहे. नाशिक, लासलगाव सह जिल्ह्यातल्या बहुताशी विविध बाजार समित्यांमध्ये कांद्यासह कृषी मालाचे लिलाव बंद राहणार आहे.

<><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज गुजरात टायटन्सची पंजाब किंग्जशी लढत होणार आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरू होईल.

<><><><>

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण भंडारा-गोंदिया लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

//<><><><><>//